# Cultural committee Activities Report: 2023-2024

The cultural department of ASP College, Devrukh plays a vital role in organizing and conducting various cultural activities and events for the benefit of the students and staff. The department's objective is to showcase the rich and diverse cultural legacy of India and Maharashtra, and to encourage creativity and talent among the students.

The cultural department of ASP College, Devrukh is an essential part of the college and helps in the holistic development of the students and staff. The department works hard to create a lively and dynamic cultural atmosphere in the college and to improve the academic and extracurricular performance of the college.

The following faculty members are responsible for organizing and overseeing the cultural activities for the entire academic year:

| | |
|---|---|
| **Mr. V.P.Shrangare** | **Convenor** |
| **Mrs. P.M. Bhopalkar** | **Member** |
| **Miss. M.S. Paranjape** | **Member** |
| **Mr. D. Patanakar** | **Member** |
| **Mr. P.P. Lingayat** | **Member** |
| **Miss. P.S Shinde** | **Member** |
| **Mr.A.B.Pethkar** | **Member** |
| **Mrs.L.R. Tambe** | **Member** |
| **Miss. N.N. Akhade** | **Member** |
| **Miss.V.P.Revane** | **Member** |
| **Miss. S.N.Purohit** | **Member** |
| **Mr.O.M.Parkar** | **Member** |

## Mumbai University Youth Festival-Zonal Level

We proudly present you; students of our college participated in the 56th Youth Festival zonals conducted by University of Mumbai. Competing in 25 events and securing ranks in 16 events. This was the preliminary round of the festival, which showcases the talents and skills of young

students from various colleges. We congratulate our students for their hard work and dedication.






| Sr. No. | Event Name | Participants Name | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Clay modeling | Rahate Suyog Chandrakant | 1st |
| 2 | Rangoli | Vahalkar Akshay Shivaji | 1st |
| 3 | Mehndi | Shinde Siddhi Lahu | 1st |
| 4 | Mono act | Gavandi Sakshi Madhukar | 1st |
| 5 | Story Telling (B) | Chavhan Tanaya Rajesh | 1st |
| 6 | Clay modelling | Rahate Suyog Chandrakant | 1st |
| 7 | Folk dance | Pashte Priti Uday,<br>Bhosale Vaishnavi Rajendra, | 2nd |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Gavandi Sakshi Madhukar<br>Nanavare Aakanskha Sitaram<br>Badabe Sakshi Ganesh<br>More Sayali Sunil<br>Nalawade Namrata Sanjay<br>Kamble Sakshi Yashwant | |
| 8 | Mono act (C) | Khedaskar Sahil Jaydeep | 2nd |
| 9 | Skit group (A) | Bhosale Vaishnavi  Rajendra<br>Avasare Sharvari Charudatt<br>Vaidya Shriya Mangesh<br>Sawant Sakshi Suryakant<br>Shinde Pratham Anil<br>Gurav Omkar Kiran | 2nd |
| 10 | Cartooning | Rahate Suyog Chandrakant | 2nd |
| 11 | Collage | Rahate Suyog Chandrakant | 2nd |
| 12 | On the spot painting | Vahalkar Akshay Shivaji | 2nd |
| 13 | Indian Classical vocal solo | Sanskriti Sunil Brid | 3rd |
| 14 | Indian light vocal solo | Sanskriti Sunil Brid | 3rd |
| 15 | Natyasangeet | Sanskriti Sunil Brid | 3rd |
| 16 | Poster Making | Vahalkar Akshay Shivaji | Consolation |

## Mumbai University Final Level

**Our college has received the OVERALL CHAMPIONSHIP of the 'Fine Art' category of the Mumbai University 56th Youth Festival. Akshay Wahalkar, Suyog Rahate, Siddhi Shinde, Shravani Rajwade, Omkar Ghadshi and mentor Shri. Suraj Mohite and Shri. Vilas Rahate Congratulations to all of you from the college family**


University of Mumbai
DEPARTMENT OF STUDENTS' DEVELOPMENT
Prize Distribution Ceremony
of 56th Inter-Collegiate / Institute / Department Youth Festival
Tuesday, July 30, 2024
Chief Guest
Shivaji Satam
Youth Festival



University of Mumbai

DEPARTMENT OF STUDENTS' DEVELOPMENT

Result of 56th Inter-Collegiate/Institute/Department Youth Festival (Final Round): 2023-24

Overall and Sectionwise Championships

| Sr. No. | Championship | Name of the College |
|---|---|---|
| 1 | Overall Championship | R.A. Podar College of Commerce and Economics, Matunga |
| 2 | Overall Runner Championship | Mithibai College of Arts, Chauhan Institute of Science and Amrutben Jivanlal College of Commerce and Economics, Vile Parle |
| 3 | Overall Second Runner Championship | K.G. Joshi College of Arts and N.G. Bedekar College of Commerce, Thane |
| 4 | Overall Championship in Music Section | R.A. Podar College of Commerce and Economics, Matunga |
| 5 | Overall Championship in Dance Section | R.A. Podar College of Commerce and Economics, Matunga |
| 6 | Overall Championship in Theatre Section | R.A. Podar College of Commerce and Economics, Matunga |
| 7 | Overall Championship in Fine Art Section | Nyayadhish Tatyasaheb Athalye Arts, Vedmurti S.R. Sapre Commerce and Vidhidnya Dadasaheb Pitre Science College, Devrukh |
| 8 | Overall Championship in Literary Section | Ramnarain Ruia Autonomous College, Matunga |

Sd/-
Dr. Sunil Patil
I/c Director,
Department of Students' Development,
University of Mumbai

**Final Round of Youth Festival organized by University of Mumbai was a huge success, with students securing medals in six different events.**

| Sr. No. | Event name | Participants Name | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Folk Dance | Pashte Priti Uday,<br>Bhosale Vaishnavi Rajendra,<br>Gavandi Sakshi Madhukar<br>Nanavare Aakanskha Sitaram<br>Badabe Sakshi Ganesh<br>More Sayali Sunil<br>Nalawade Namrata Sanjay<br>Kamble Sakshi Yashwant | 1st |
| 2 | Cartooning | Rahate Suyog Chandrakant | 1st |
| 3 | Poster Making | Vahalkar Akshay Shivaji | 1st |
| 4 | Mehndi | Shinde Siddhi Lahu | 1st |
| | | | |
| 5 | Clay Modeling | Rahate Suyog Chandrakant | 2nd |
| 6 | Rangoli | Vahalkar Akshay Shivaji | 2nd |








University of Mumbai · Youth Festival

Music · Dance · Literary · Theatre · Fine Art

**DEPARTMENT OF STUDENTS' DEVELOPMENT**

56 Youth Festival
*(Final Round)*

*Certificate of Merit*

This is to certify that **Ms. Pashte Priti Uday** of **Nyayadhish Tatyasaheb Athalye Arts, Vedmurti S.R. Sapre Commerce and Vidhidnya Dadasaheb Pitre Science College, Devrukh** partcipated and secured **FIRST RANK** in **Indian Folk Dance** competition at **56th Inter-Collegiate / Institute / Department Cultural Youth Festival (Final Round): 2023-24** organized by University of Mumbai at **Anna Leela College of Commerce and Economics and Shobha Jayaram Shetty College for BMS, Kurla, Mumbai** on **October 6-7, 2023.**

**MR. NILESH SAWE**
CULTURAL CO-ORDINATOR
University of Mumbai

**DR. SUNIL PATIL**
I/c DIRECTOR
Department of Students' Development,
University of Mumbai

Date: **October 6-7, 2023**
Place: **Mumbai**








अक्षय वहाळकर याचे सुवर्णपदक विजेते पोस्टर.



सुयोग रहाटे याचे रौप्यपदक विजेते क्ले मॉडेलिंग.


UNIVERSITY OF MUMBAI
INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING (IDOL)
IDOL REGIONAL CENTRE AT CHURCHGATE
मुंबई विद्यापीठ


मुंबई मेरी जान !
चलो मुंबई...
















University of Mumbai

Youth Festival

DEPARTMENT OF STUDENTS' DEVELOPMENT

56 Youth Festival
(Final Round)

Certificate of Merit

This is to certify that **Mr. Rahate Suyog Chandrakant** of **Nyayadhish Tatyasaheb Athalye Arts, Vedmurti S.R. Sapre Commerce and Vidhidnya Dadasaheb Pitre Science College, Devrukh** parcipated and secured **FIRST RANK** in **Collage** competition at **56th Inter-Collegiate / Institute / Department Cultural Youth Festival (Final Round): 2023-24** organized by University of Mumbai at **Vidyapeeth Vidyarthi Bhavan, Churchgate, Mumbai** on **October 3, 2023.**

MR. NILESH SAWE
CULTURAL CO-ORDINATOR
University of Mumbai

DR. SUNIL PATIL
I/c DIRECTOR
Department of Students' Development,
University of Mumbai

Date: **October 3, 2023**
Place: **Mumbai**



University of Mumbai

Youth Festival

DEPARTMENT OF STUDENTS' DEVELOPMENT

56 Youth Festival
(Final Round)

Certificate of Merit

This is to certify that **Mr. Rahate Suyog Chandrakant** of **Nyayadhish Tatyasaheb Athalye Arts, Vedmurti S.R. Sapre Commerce and Vidhidnya Dadasaheb Pitre Science College, Devrukh** parcipated and secured **FIRST RANK** in **Cartooning** competition at **56th Inter-Collegiate / Institute / Department Cultural Youth Festival (Final Round): 2023-24** organized by University of Mumbai at **Vidyapeeth Vidyarthi Bhavan, Churchgate, Mumbai** on **August 31, 2023.**

MR. NILESH SAWE
CULTURAL CO-ORDINATOR
University of Mumbai

DR. SUNIL PATIL
I/c DIRECTOR
Department of Students' Development,
University of Mumbai

Date: **August 31, 2023**
Place: **Mumbai**

Suyog Rahate and Akshay Vahalkar were among the student candidates who took part in the selection Round of the Mumbai University Cultural Association.

Both Candidates impressed the judges with their skills therefore they were selected to represent University of Mumbai for ***inter university Indradhanushya Festival Chatrapati sambhajinagar*** and ***Hunar 37th National inter university youth festival 2024 Ludhiana, Punjab***

And also ***Shataspandan 37th inter university west zone youth festival Nagpur***

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Gold Medal | Individual | Mr. Suyog Chandrakant Rahate | State/Indradhanushya | Clay Modelling | Mar 2023-24 |
| Gold Medal | Team | Mr. Suyog Chandrakant Rahate | National/West zone (Shataspandan) | Installation | Jan 2023-24 |
| Bronze | Team | Mr. Suyog Chandrakant Rahate | National/Hunar 2024 (Punjab) | Installation | Mar 2023-24 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Bronze | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | State/Indradhanushya | Rangoli | Mar 2023-24 |
| Bronze | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | State/Indradhanushya | Poster Making | Mar 2023-24 |
| Gold Medal | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/West zone (Shataspandan) | Rangoli | Jan 2023-24 |
| Silver | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/West zone (Shataspandan) | Collage | Jan 2023-24 |
| Bronze | Team | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/West zone (Shataspandan) | Installation | Jan 2023-24 |
| Gold Medal | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/Hunar 2024 (Punjab) | Rangoli | Mar 2023-24 |
| Gold Medal | Individual | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/Hunar 2024 (Punjab) | Collage | Mar 2023-24 |
| Bronze | Team | Mr. Akshay Shivaji Vahalkar | National/Hunar 2024 (Punjab) | Installation | Mar 2023-24 |

# Other various Activities /Events Participation

**1. Prof. Mrunal Hegshetye Elocution Competition-**

Four students from our College enthusiastically participated in the Late Mrinal Hegshetye Elocution Competition and brought laurels to the institution. The names of the participants are Payal Dorkhade, Swarup Dorkhade, Tanaya Chavan and Pragati Shinde.

**2. Dr. Tatyasaheb Natu College of arts and senior college commerce, Marg- Tamhane**

Four students from our College participated in Distict level elocution Competition held at Dr. Tatyasaheb Natu college of arts and senior college commerce, Marg- Tamhane and brought glory to the institution. The names of the participants are Gautami Sardesai, Kiran Takke, Dipti Karambele, and Sakshi Karambele.

**3. Gogate Jogalekar College, SBI & Maharashtra Bank Association organised a district level elocution competition**

four students from our college passionately participated in this competition. Payal Dorkhade secured third rank in this competition.

Participated Student's List- 1) Payal Dorkhade 2) Swarup Dorkhade 3) Pragati Shinde

4. Saptahik Sakal organised a Multi-lingual competition of Mehndi designing; Siddhi secured second rank - Siddhi Lahu Shinde (F.Y.B.A.)

5. 1$^{st}$ Rank in District level Mehndi competition organised by Maratha Mandal, Ratnagiri- Siddhi Lahu Shinde (F.Y.B.A.)

6.1$^{st}$ Rank in 'Yuvabrahma in Mehndi competition 2023 organised by Kuwarbaav Panchakroshi Brahman Sabha- Siddhi Lahu Shinde (F.Y.B.A.)

| **Name of the event/competition organized by our department** | **Date of event/competition (DD-MM-YYYY)** |
|---|---|
| Mehandi Competition (For UG/PG Students) | 20-12-2023 |

| | |
|---|---|
| Rangoli Competition (For UG/PG Students) | 20-12-2023 |
| Swami Swarupanand Biography and philosophy Witten exam (For UG/PG Students) | 21-01-2023 |

# PUBLISHED NEWS

शब्दांना सत्याची धार
प्रहार

## आठल्ये-सप्रे-पित्रेच्या सुयोग रहाटे याचे कोलाजमध्ये तर विद्यार्थिनींचे लोकनृत्य प्रकारामध्ये सुवर्ण यश






सुयोग रहाटे मिळालेल्या पदक व प्रमाणपत्रासह सोबत सुयोग याने साकारलेले कोलाज तर दुसऱ्या छायाचित्रात मान्यवरांसोबत लोकनृत्य कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विद्यार्थिनी.

**देवरुख (प्रतिनिधी)**

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने नुकत्याच मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ५६ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत २ सुवर्ण पदक प्राप्त करून महाविद्यालयाच्या सन्मानात भर घातली आहे. नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत फाईन आर्टमधील कोलाज या कला प्रकारात सुयोग चंद्रकांत रहाटे याने सुवर्ण पदकाला गवसणी घातली, तर विद्यार्थिनींनी सामूहिक लोकनृत्य प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

सुयोग रहाटे याने कोलाज कला सादर करताना स्थिरचित्र साकारून सुवर्णपदक प्राप्त केले. तर महाविद्यालयातील मुलींच्या संघाने त्रिपुरा राज्यातील रेआंग जमातीचे होजागिरी हे लोकनृत्य सादर करून सुवर्णपदक प्राप्त केले. या लोकनृत्यात आठ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये आकांक्षा ननावरे, प्रिती पाष्टे, नम्रता नलावडे, सायली मोरे, साक्षी बंडबे, साक्षी कांबळे, साक्षी गवंडी आणि वैष्णवी भोसले यांचा समावेश होता. या लोकनृत्याचे दिग्दर्शन प्रथमेश पिंपळकर, श्रेया ढेरे व दीपेश घाणेकर यांनी केले होते.

५६ व्या मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवात महाविद्यालयाला यावर्षी एकूण ५ सुवर्ण व २ रौप्य पदके प्राप्त झाली. फाईन आर्ट कलाप्रकारात ४ सुवर्ण पदके व २ रौप्य पदके प्राप्त करून महाविद्यालयाने आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना फाईन आर्ट कला प्रकारांसाठी कलाशिक्षक सुरज मोहिते आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, ॲड.वेदा प्रभुदेसाई, प्राचार्य डॉ.नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ.सरदार पाटील, प्रा. विकास शृंगारे आणि प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

Ratnagiri Edition
Oct, 14 2023 Page No, 8
https://epaper.prahaar.in

# 'आठल्ये-सप्रे'चे फाईन आर्टमध्ये सात प्रकारात यश

## ५६ वा युवा महोत्सव; प्राथमिक फेरीत केली चमकदार कामगिरी

देवरूख, ता. १६ : देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या ५६ व्या युवा महोत्सवाच्या प्राथमिक फेरीत १५ बक्षिसे मिळवून चमकदार कामगिरी केली आहे. या सर्वच्या सर्व सांघिक व वैयक्तिक कलाप्रकारांनी मुंबई विद्यापीठाच्या अंतिम स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. महाविद्यालयाने फाईन आर्टमधील सर्वच्या सर्व म्हणजे ७ कलाप्रकारात यशस्वी कामगिरी करून यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती ब्रीद हिने गायनप्रकारात ३ बक्षिसे प्राप्त करून आपल्या कलेची चुणूक दाखवली.



फाईनआर्टमधील यशस्वी ठरलेल्या ७ कलाकृतींचा कोलाज.

महाविद्यालयातील सहभागी व यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शकांच्या सत्काराचे आयोजन केले होते. या प्रसंगी व्यासपिठावर प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक समन्वयक प्रा. विकास शृंगारे, प्रा. डॉ. वर्षा फाटक, प्रा. नेहलता पुजारी, प्रा. धनंजय दळवी यांची उपस्थिती होती.

सत्कार केलेले विद्यार्थी, मार्गदर्शक व त्यांचे कलाप्रकार असे - संस्कृती ब्रीद भावगीत गायन (द्वितीय), शास्त्रीय गायन (तृतीय), नाट्यसंगीत (तृतीय). सुयोग रहाटे मातीकाम (प्रथम), कोलाज (द्वितीय), कार्टूनिंग (द्वितीय), अक्षय वहाळकर रांगोळी (प्रथम), ऑन दी स्पॉट पेंटिंग (द्वितीय), पोस्टर मेकिंग (उत्तेजनार्थ), सिद्धी शिंदे आणि श्रावणी राजवाडे मेहंदी डिझाइन (प्रथम), साक्षी सावंत मोनो ॲक्टिंग मराठी (प्रथम), तनया चव्हाण कथाकथन हिंदी (प्रथम), साहिल खेडस्कर मोनो ॲक्टिंग हिंदी (द्वितीय), स्किट मराठी (द्वितीय) ओमकार गुरव, प्रथम शिंदे, साक्षी सावंत, श्रेया वैद्य, श्रावणी अवसरे व वैष्णवी भोसले, भारतीय लोकनृत्य (द्वितीय) साक्षी कांबळे, प्रीती पाष्टे, नम्रता नलावडे, सायली मोरे, साक्षी बडबे, आकांक्षा ननावरे, साक्षी गवंडी व वैष्णवी भोसले, मार्गदर्शक फाईन आर्ट कलाशिक्षक सुरज मोहिते, विलास रहाटे. गायन राधा भट. नृत्य प्रथमेश पिंपळकर, श्रेया ढेरे. नाट्य दीपेश घाणेकर, सागर माने.

# मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात कोकणची बाजी

## 'आठल्ये-सप्रे-पित्रे'च्या सुयोग रहाटे याचे कोलाजमध्ये तर लोकनृत्यात 'सुवर्ण' यश

देवरुख दि. १३ ( प्रतिनिधी ) - देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने नुकत्याच मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ५६व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत २ सुवर्ण पदके प्राप्त करून महाविद्यालयाच्या सन्मानात भर घातली आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या या स्पर्धेत फाईन आर्टमधील 'कोलाज' या कला प्रकारात सुयोग चंद्रकांत रहाटे याने सुवर्णपदकला गवसणी घातली, तर विद्यार्थिनींनी 'सामूहिक लोकनृत्य' प्रकारात सुवर्णपदक प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, ॲड. वेदा प्रभुदेसाई, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विकास शृंगारे आणि प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### असे मिळवले विद्यार्थ्यांनी सुयश

सुयोग रहाटे याने कोलाज कला सादर करताना स्थिरचित्र साकारून सुवर्णपदक प्राप्त केले. तर महाविद्यालयातील मुलींच्या संघाने त्रिपुरा राज्यातील रेआंग जमातीचे होजागिरी हे लोकनृत्य सादर करून सुवर्णपदक आपलेसे केले. या लोकनृत्यात आठ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये आकांक्षा ननावरे, प्रीती पाष्टे, नम्रता नलावडे, सायली मोरे, साक्षी बडबे, साक्षी कांबळे, साक्षी गवंडी आणि वैष्णवी भोसले यांचा समावेश होता. या लोकनृत्याचे दिग्दर्शन प्रथमेश पिंपळकर, श्रेया ढेरे व दीपेश घाणेकर यांनी केले होते. ५६व्या मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवात महाविद्यालयाला या वर्षी एकूण ५ सुवर्ण व २ रौप्य पदके प्राप्त झाली. फाईन आर्ट कलाप्रकारात ४ सुवर्ण पदके व २ रौप्य पदके प्राप्त करून महाविद्यालयाने आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना फाईन आर्ट कला प्रकारांसाठी कलाशिक्षक सूरज मोहिते आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

नवराष्ट्र

# आठल्ये-सप्रे-पित्रे कॉलेजला विविध पदके

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धेत यश

संगमेश्वर, (वा.) मुंबई विद्यापीठाच्या ५६व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावले. ही दोन पदके महाविद्यालयाला फाईन आर्ट या कला प्रकारांमध्ये प्राप्त झाली आहेत. फाईन आर्ट मधील पोस्टर मेकिंग या कला प्रकारात अक्षय शिवाजी वहाळकर याने 'मोबाईलचा अतिवापर' या विषयावर आपली कला सादर करून सुवर्णपदकाला गवसणी घातली. अक्षय वहाळकर याने गतवर्षी मुंबई विद्यापीठ संघातून सहभागी होऊन भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत पोस्टर मेकिंग व रांगोळी या कलाप्रकारात पदक प्राप्त करून चमकदार कामगिरी केली होती. सुयोग चंद्रकांत रहाटे याने क्ले मॉडेलिंग या कला प्रकारात रौप्य पदक मिळविले. याच स्पर्धेत





सुयोग रहाटे याने कार्टूनिंग कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे यांना कला शिक्षक सुरज मोहिते, विलास रहाटे आणि प्रा. धनंजय दळवी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. यशाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, ॲड. वेदा प्रभुदेसाई, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विकास श्रृगारे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Ratnagiri Plus Edition
05 September 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

# 'आठल्ये-सप्रे-पित्रे'ची यशाची घोडदौड

## मुंबई विद्यापीठात पटकावले १ सुवर्ण व १ रौप्य पदक

संगमेश्वर, (वा.) मुंबई विद्यापीठाच्या ५६व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची घोडदौड कायम ठेवताना आणखीन १ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावून फाईन आर्ट कला प्रकारातील आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ५६व्या युवा महोत्सवातील फाईन आर्ट कला प्रकारांमध्ये आतापर्यंत ३ सुवर्ण पदके व २ रौप्य पदकांना गवसणी घातली आहे.

मेहंदी डिजाइन' या कला प्रकारात सिद्धी लवू शिंदे हीने 'संगीत वाद्य' या विषयावर आपली कला सादर करून सुवर्णपदक



प्राप्त केले. अक्षय वहाळकर याने 'रांगोळी' या कलाप्रकारात 'निसर्ग चित्र' साकारून रौप्य पदक प्राप्त करून चमकदार कामगिरी केली आहे.

सुयोग, अक्षय आणि सिद्धी यांना कलाशिक्षक सुरज मोहिते व विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, ॲड. वेदा प्रभुदेसाई, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विकास श्रृगारे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाची युवा महोत्सवाच्या प्राथमिक फेरीत चमकदार कामगिरी



## फाईन आर्टमध्ये ७ प्रकारात यश

**देवरुख (प्रतिनिधी)**

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या ५६ व्या युवा महोत्सवाच्या प्राथमिक फेरीत १५ बक्षिसे मिळवून चमकदार कामगिरी केली आहे. या सर्वच्या सर्व सांघिक व वैयक्तिक कलाप्रकारांनी मुंबई विद्यापीठाच्या अंतिम स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. महाविद्यालयाने फाईन आर्टमधील सर्वच्या सर्व म्हणजे ७ कला प्रकारात यशस्वी कामगिरी करून यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती ब्रीद हिने गायन प्रकारात ३ बक्षीसे प्राप्त करून आपल्या कलेची चुणूक दाखवली.

महाविद्यालयातील सहभागी व यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शकांच्या सत्काराचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, प्रा. विकास शृंगारे, प्रा.डॉ. वर्षा फाटक, प्रा.नेहलता पुजारी, प्रा.धनंजय दळवी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. विकास शृंगारे यांनी केले.

सत्कार करण्यात आलेले विद्यार्थी, मार्गदर्शक व त्यांचे कलाप्रकार पुढील प्रमाणे - संस्कृती ब्रीद- भावगीत गायन (द्वितीय), शास्त्रीय गायन (तृतीय), नाट्यसंगीत (तृतीय). सुयोग रहाटे- मातीकाम (प्रथम), कोलाज (द्वितीय), कार्टूनिंग (द्वितीय). अक्षय वहाळकर-रांगोळी (प्रथम), ऑन द स्पॉट पेंटिंग (द्वितीय), पोस्टर मेकिंग (उत्तेजनार्थ). सिद्धी शिंदे आणि श्रावणी राजवाडे, मेहंदी डिजाइन (प्रथम). साक्षी सावंत- मोनो ॲक्टींग- मराठी (प्रथम). तनया चव्हाण- कथाकथन- हिंदी (प्रथम). साहिल खेडस्कर- मोनो ॲक्टींग- हिंदी (द्वितीय). स्किट- मराठी- द्वितीय- ओमकार गुरव, प्रथम शिंदे, साक्षी सावंत, श्रेया वैद्य, श्रावणी अवसरे व वैष्णवी भोसले. भारतीय लोकनृत्य- द्वितीय- साक्षी कांबळे, प्रिती पाष्टे, नम्रता नलावडे, सायली मोरे, साक्षी बडवे, आकांक्षा ननावरे, साक्षी गवंडी व वैष्णवी भोसले.

मार्गदर्शक- फाईन आर्ट - कलाशिक्षक सुरज मोहिते, विलास रहाटे. गायन- राधा भट. नृत्य- प्रथमेश पिंपळकर, श्रेया ढेरे. नाट्य- दीपेश घाणेकर, सागर माने.

या कार्यक्रमात नाट्य दिग्दर्शक दीपेश घाणेकर यांनी विद्यार्थ्यांची पूर्वतयारी आणि स्पर्धेतील नाट्य सादरीकरण या दरम्यान घडलेले विविध प्रसंग कथन केले.

सूत्रसंचालन प्रा. दिवाकर पाटणकर आणि आभार प्रा. शुभम पेठकर यांनी मानले.

# सुयोग रहाटेला कार्टुनिंगमध्ये सुवर्णपदक

## मुंबई विद्यापीठाच्या ५६ व्या युवा महोत्सवात मिळवले यश

साडवली, ता. १ : मुंबई विद्यापीठाच्या ५६ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या सुयोग रहाटे याने फाईनआर्ट प्रकारातील कार्टूनिंग (व्यंगचित्र) कलेमध्ये सुवर्णपदक प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.







**मुंबई :** सुयोग रहाटे याला सन्मानित करताना मान्यवर, दुसऱ्या छायाचित्रात सुयोग रहाटे याचे सुवर्णपदकप्राप्त कार्टूनिंग. (छाया : विलास रहाटे)

सुयोग रहाटे महाविद्यालयात द्वितीय वर्ष बी. व्होक.-बँकिंग अँड फायनान्स या वर्गात शिक्षण घेत आहे. गतवर्षी सुयोग याने याच स्पर्धेत मुंबई विद्यापीठाची २ रौप्यपदके प्राप्त केली होती. कार्टूनिंग स्पर्धेसाठी आयोजकांनी ''मुंबई मेरी जान'' आणि ''वर्क फ्रॉम होम'' हे दोन विषय दिले होते. सुयोग याने ''मुंबई मेरी जान'' या विषयावर कार्टूनिंग करून परीक्षकांची मने जिंकून विजेतेपद प्राप्त केले. सुयोगला कलाशिक्षक सूरज मोहिते, विलास रहाटे आणि प्रा. धनंजय दळवी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व मार्गदर्शक विलास रहाटे यांनी मार्गदर्शक म्हणून या स्पर्धेत अनोखा विक्रम केला आहे. विलास रहाटे यांनी मार्गदर्शन केलेल्या सुवर्णपदक प्राप्त सुयोग रहाटेसह जोशी-बेडेकर कॉलेज, ठाणे येथील श्रुती कामतने रौप्यपदक, तर विलेपार्लेतील मिठीबाई कॉलेजच्या झोया वारसीने कास्यपदक प्राप्त करून विजेतेपदाची हॅट्ट्रिक साधली आहे.

# 'आठल्ये-सप्रे-पित्रे'च्या अक्षय वहाळकर व सुयोग रहाटे यांची भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवासाठी निवड

**देवरुख**

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या अक्षय शिवाजी वहाळकर(तृतीय वर्ष, विज्ञान) आणि सुयोग चंद्रकांत रहाटे(द्वितीय वर्ष, बी व्होक-बँकिंग अँड फायनान्स) यांनी मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघातून नुकत्याच संपन्न झालेल्या ३७व्या आंतर विद्यापीठ पश्चिम विभाग युवा महोत्सव(शतस्पंदन)- २०२४ मध्ये सहभागी होऊन भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे झालेल्या 'शतस्पंदन-२०२४' या युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठ संघांने फाईन आर्ट्स(उपयोजित कला) प्रकाराचे सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले.




पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या पदक प्राप्त कलाकृतींचा कोलाज.

'शतस्पंदन-२०२४' स्पर्धेत अक्षय वहाळकर याने रांगोळी मध्ये सुवर्णपदक, कोलाज मेकिंग मध्ये रौप्य पदक, तर सांघिक मांडणी शिल्प (इन्स्टॉलेशन) कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. सुयोग रहाटे याने सांघिक मांडणी शिल्प(इन्स्टॉलेशन) मध्ये सहभागी होऊन सुवर्णपदक पटकावण्यास हातभार लावला. मांडणी शिल्प सांघिक कला प्रकारात अक्षय व सुयोग सह आकाश स्थूल व कार्तिक कदम सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये मांडणी शिल्पासाठी विश्वास (FAITH), रांगोळी करिता स्पर्धकांना चार रंगात कोणत्याही विषयावर रांगोळी काढण्याची अनुमती देण्यात आली होती, तर कोलाज मेकिंग करीता निसर्ग चित्र(Landscape) हा विषय देण्यात आला होता.

अक्षय वहाळकर या वर्षासह सलग दुसऱ्या वर्षी मुंबई विद्यापीठ संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होत आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व कला मार्गदर्शक विलास रहाटे मुंबई विद्यापीठाच्या फाईन आर्ट संघाला सलग दुसऱ्या वर्षी मार्गदर्शन करत आहेत. मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघाला विलास रहाटे यांच्यासह केशर चोपडेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक संघाला डॉ. सुनील पाटिल(संचालक, विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ) आणि निलेश सावे(सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ) यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, ॲड. वेदा प्रभुदेसाई, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विकास शृंगारे आणि सहकारी, कलाशिक्षक सुरज मोहिते, प्रा. धनंजय दळवी आणि ग्रंथपाल प्रा. सुभाष मायंगडे, तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# इंद्रधनुष्य युवा महोत्सवात सुयोग रहाटे व अक्षय वहाळकर यांची चमकदार कामगिरी

**देवरुख (प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सव : २०२३-२४ चे सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने प्राप्त करून आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.



इंद्रधनुष्य युवा महोत्सवातील सुयोग रहाटे व अक्षय वहाळकर यांच्या पदकप्राप्त कलाकृती.

इंद्रधनुष्य युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या फाईन आर्ट टीमने २ सुवर्णपदके, १ रौप्यपदक आणि २ कांस्यपदके प्राप्त करून आपली कर्तबगारी सिद्ध केली. या फाईन आर्ट टीममध्ये देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या सुयोग चंद्रकांत रहाटे आणि अक्षय शिवाजी वहाळकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सुयोग रहाटे याने क्ले-मॉडेलिंग(मातीकाम) या कला प्रकारात सुवर्णपदक, तर अक्षय वहाळकर याने रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या दोन कला प्रकारात कांस्यपदकाला गवसणी घातली. मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक संघाला डॉ. सुनील पाटील(संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ), निलेश सावे (सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ) यांच्यासह फाईन आर्ट प्रकारांसाठी केशर चोपडेकर आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

सुयोग रहाटे आणि अक्षय वहाळकर यांची पंजाब कृषी विद्यापीठ, जालंधर, पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघातून यापूर्वीच निवड झाली आहे. सुयोग आणि अक्षय यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील आदिंनी अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आरएमसीईटी, आंबवच्या एक्सप्लोर स्पर्धेचे विजेतेपद आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाला

देवरुख (प्रतिनिधी)

राजेंद्र माने कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, आंबवच्या मास्टर इन मॅनेजमेंट स्टडीज विभागाने आयोजित केलेल्या एक्सप्लोर-२०२४ स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कला प्रकारात पुन्हा एकदा उत्तम यश मिळवून, गत यशाची परंपरा कायम राखली आहे. या स्पर्धेतील कलाप्रकारात अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे यांनी गतवर्षाप्रमाणे याहीवर्षी चमकदार कामगिरी करून स्पर्धेवर आपली मोहर उमटवली.

महाविद्यालयाला मिळालेले यश पुढीलप्रमाणे -

रांगोळी विजेता- अक्षय वहाळकर, फेस पेंटिंग विजेता- अक्षय वहाळकर आणि उपविजेता- सुयोग रहाटे, अॅड मॅड जुनून उपविजेती जोडी- अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे, मेहंदी विजेती- सिद्धी शिंदे, बेस्ट ऑफ वेस्ट विजेती जोडी- साक्षी गवंडी आणि सोनाली सुर्वे, फोटोग्राफी विजेता- सौरभ मेस्त्री, क्लॅश ऑफ ब्रेन उपविजेती जोडी- अजिंक्य लाणे व तन्वी चाळके, बेस्ट पर्सोना उपविजेती- श्रावणी नार्वेकर.


सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक माजी मंत्री रवींद्र माने, उद्योजक गौरांग आगाशे आणि प्राचार्य डॉ. महेश भागवत यांच्याकडून स्वीकारताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कलाप्रकारांसाठी कला शिक्षक सुरज मोहिते, कला प्रशिक्षक विलास रहाटे आणि प्रा. धनंजय दळवी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या सर्वसाधारण विजेतेपदाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, अॅड. वेदा प्रभूदेसाई, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, प्रा. विकास शृंगारे आणि सहकारी, ग्रंथपाल प्रा. सुभाष मायंगडे आणि कार्यालयीन अधीक्षिका मिता भागवत यांनीही अभिनंदन केले.

---

अक्षय वहाळकर, सुयोग रहाटे यांची चमकदार कामगिरी

# 'एक्सप्लोर-२०२४'चे विजेतेपद 'आठल्ये-सप्रे-पित्रे'ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**देवरुख :** राजेंद्र माने कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, आंबवच्या मास्टर इन मॅनेजमेंट स्टडीज विभागाने 'एक्सप्लोर-२०२४' स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने पटकावले.

या स्पर्धेतील कलाप्रकारात अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे यांनी गतवर्षाप्रमाणे याहीवर्षी चमकदार कामगिरी करून स्पर्धेवर आपली मोहर उमटवली. महाविद्यालयाने रांगोळी व फेस पेंटींगमध्ये अक्षय वहाळकर विजेता ठरला. फेस पेंटिंगमध्ये सुयोग रहाटे उपविजेता, अॅड मॅड जुनूनमध्ये उपविजेती जोडी- अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे, मेहंदीत विजेती- सिद्धी शिंदे, बेस्ट ऑफ वेस्टमध्ये विजेती जोडी- साक्षी गवंडी आणि सोनाली सुर्वे, फोटोग्राफीत विजेता- सौरभ मेस्त्री, कलॅश ऑफ ब्रेनमध्ये उपविजेती जोडी अजिंक्य लाणे व तन्वी चाळके, बेस्ट पर्सोनामध्ये उपविजेती श्रावणी नार्वेकर ठरली.


आंबव येथील 'एक्सप्लोर - २०२४' स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक रवींद्र माने, उद्योजक गौरांग आगाशे आणि प्राचार्य डॉ. महेश भागवत यांच्याकडून आठल्ये - सप्रे - पित्रे महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला.

कलाप्रकारांसाठी कला शिक्षक सुरज मोहिते, कला प्रशिक्षक विलास रहाटे आणि प्रा. धनंजय दळवी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशानंतर अभिनंदन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण मेहनतीबरोबरच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विजेतेपदामध्ये मोलाचा वाटा आहे. अशा स्थानिक स्पर्धांमध्ये सहभागी होऊन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरापर्यंत सातत्यपूर्ण नेत्रदीपक कामगिरी केल्याचे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या सर्वसाधारण विजेतेपदाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, अॅड. वेदा प्रभूदेसाई, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विकास शृंगारे आणि सहकारी, ग्रंथपाल प्रा. सुभाष मायंगडे आणि कार्यालयीन अधीक्षिका मिता भागवत यांनी अभिनंदन केले.

# आंतरविद्यापीठ महोत्सवात अक्षय, सुयोग चमकले

**सकाळ वृत्तसेवा**

संगमेश्वर, ता. ११ : पंजाब कृषी विद्यापीठ येथे झालेल्या ३७व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या अक्षय वहाळकर आणि सुयोग रहाटे यांनी फाईन आर्ट (उपयोजित कला) या प्रकारात यश मिळवून दमदार कामगिरी केली.

अक्षय याने राष्ट्रीय स्पर्धेत २ सुवर्ण आणि १ कास्यपदक मिळवले. त्याने सलग दुसऱ्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत बहारदार कामगिरी केली. त्याने रांगोळी व कोलाज या दोन्ही प्रकारात सुवर्णपदक तर मांडणी शिल्प (इन्स्टॉलेशन) या सांघिक प्रकारात कास्यपदक प्राप्त केले. मांडणी शिल्प या कला प्रकारासाठी "आदिवासी संस्कृती" या विषयावर अक्षयसह सुयोग रहाटे, आकाश स्थूल व कार्तिक कदम यांनी सादरीकरण केले होते. अक्षयने रांगोळीचे सुवर्णपदक मिळवताना "संस्कृती" या विषयावर तर कोलाजसाठी "पोर्ट्रेट" हा विषय सादर केला होता. मुंबई विद्यापीठ संघाला सांस्कृतिक शोभायात्रेचे सुवर्णपदक प्राप्त झाले. यामधील सेट बनवण्यासाठी अक्षय आणि सुयोग यांनी मेहनत घेतली. मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघाला डॉ. सुनील पाटील, नीलेश सावे यांच्यासह फाईन आर्ट प्रकारांसाठी केशर चोपडेकर आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभले.



पंजाब : स्पर्धेमध्ये प्राप्त झालेल्या बक्षिसांसह अक्षय वहाळकर, मार्गदर्शक विलास रहाटे आणि सुयोग रहाटे.

# सुयोग, अक्षयचे मातीकाम, रांगोळी कलाप्रकारात वर्चस्व

## मुंबईतील इंद्रधनुष्य युवा महोत्सव; सुवर्णपदकासह कांस्यपदकाची कमाई

**सकाळ वृत्तसेवा**

साडवली, ता. २९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे झालेल्या इंद्रधनुष्य महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने मिळवून आपले पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध केले.

इंद्रधनुष्य युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या फाईन आर्ट टीमने २ सुवर्णपदके, १ रौप्यपदक आणि २ कांस्यपदके प्राप्त करून आपली कर्तबगारी सिद्ध केली. या फाईन आर्ट टीममध्ये आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या सुयोग रहाटे आणि अक्षय वहाळकर यांचा समावेश आहे. स्पर्धेत रहाटे याने क्ले-मॉडेलिंग (मातीकाम) या कलाप्रकारात सुवर्णपदक तर अक्षयने रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या दोन कलाप्रकारात कांस्यपदक मिळवले. मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक संघाला डॉ. सुनील पाटील, नीलेश सावे यांच्यासह फाईन आर्ट प्रकारांसाठी केशर चोपडेकर आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. सुयोग रहाटे आणि अक्षय वहाळकर यांची पंजाब कृषी विद्यापीठ येथे होणाऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक संघातून यापूर्वीच निवड झाली आहे. सुयोग आणि अक्षय यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा. विकास शृंगारे, कलाशिक्षक सूरज मोहिते आदींनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




सुवर्णपदक- मातीकाम: सुयोग रहाटे. | कांस्यपदक- रांगोळी: अक्षय वहाळकर. | कांस्यपदक- पोस्टर: अक्षय वहाळकर.

देवरूख : इंद्रधनुष्य युवा महोत्सवातील सुयोग रहाटे व अक्षय वहाळकर यांच्या पदकप्राप्त कलाकृती.

# देवरुख महाविद्यालयाची सुवर्ण कामगिरी

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात दोन सुवर्णपदके

**देवरुख : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ५६व्या युवा महोत्सवाच्या अंतिम स्पर्धेत शहरातील आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने २ सुवर्ण पदके प्राप्त केली. फाईन आर्टमधील 'कोलाज' या कला प्रकारात सुयोग रहाटे याने सुवर्णपदकला गवसणी घातली, तर विद्यार्थिनींनी 'सामूहिक लोकनृत्य' प्रकारात सुवर्णपदक प्राप्त करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

सुयोग रहाटे याने कोलाज कला सादर करताना स्थिरचित्र साकारून सुवर्णपदक प्राप्त केले. महाविद्यालयातील मुलींच्या संघाने त्रिपुरा राज्यातील रेआंग जमातीचे होजागिरी हे लोकनृत्य सादर करून सुवर्णपदक पटकावले. या लोकनृत्यात आकांक्षा ननावरे, प्रीती पाष्टे, नम्रता नलावडे, सायली मोरे, साक्षी बडबे, साक्षी कांबळे, साक्षी गवंडी आणि वैष्णवी भोसले यांचा समावेश होता. या लोकनृत्याचे दिग्दर्शन प्रथमेश पिंपळकर, श्रेया ढेरे व दीपेश घाणेकर यांनी केले होते. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक सुरज मोहिते आणि विलास रहाटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, नेहा जोशी, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, अॅड. वेदा प्रभूदेसाई, प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विकास शृंगारे यांनी अभिनंदन केले.



देवरुख : लोकनृत्य कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विद्यार्थिनी. (छाया : विलास रहाटे)